# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 10 April 2024
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १० एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- देशाच्या खंबीर नेतृत्वासाठी महायुतीला बिनशर्त पाठिंबा–मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची घोषणा
- लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचं सूत्र निश्चित–काँग्रेसला १७, राष्ट्रवादीला १० तर शिवसेनेला सर्वाधिक २१ जागा
- छत्रपती संभाजीनगर इथले ज्येष्ठ पत्रकार प्रमोद माने यांचं निधन
- अहमदनगर जिल्ह्यात बायोगॅसच्या विहिरीत पडून पाच जणांचा मृत्यू

आणि

- मराठवाड्याच्या अनेक भागात काल गारपिटीसह अवकाळी पाऊस

****

देशाला खंबीर नेतृत्वाची गरज असल्याने लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना महायुतीला बिनशर्त पाठिंबा देत असल्याचं, पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केलं. ते काल गुढीपाडव्यानिमित्त मुंबईत पक्ष कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. भाजपकडून आलेले राज्यसभा तसंच विधान परिषदेचे प्रस्ताव नाकारत, आपण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचाच अध्यक्ष म्हणून कार्यरत राहणार असल्याचं सांगत, राज ठाकरे यांनी, इतर सर्व चर्चांना पूर्णविराम दिला. फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी महायुतीला पाठिंबा देत आहोत, मात्र भाजपच्या ज्या गोष्टी पटणार नाहीत, त्यांना विरोध करणारच, असं त्यांनी नमूद केलं. मनसे कार्यकर्त्यांना विधानसभेच्या तयारीला लागण्याचे थेट निर्देशही राज ठाकरे यांनी यावेळी दिले. आरोग्यसेवकांना निवडणुकीच्या कामाची जबाबदारी देणं योग्य नसल्याचं मतही त्यांनी व्यक्त केलं.

****

महाराष्ट्रातल्या लोकसभेच्या ४८ मतदारसंघांसाठी महाविकास आघाडीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित झालं असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २१, काँग्रेस १७ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १० जागा लढवणार आहेत. महाविकास आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत काल याबाबत घोषणा करण्यात आली. या परिषदेला महाविकास आघाडीचे नेते उद्धव ठाकरे, शरद पवार तसंच नाना पटोले उपस्थित होते.

काँग्रेस पक्ष नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, उत्तर मध्य मुंबई, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, रामटेक, उत्तर मुंबई या जागा लढवणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बारामती, शिरुर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, दक्षिण अहमदनगर आणि बीड या जागा लढवणार आहे.

तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशिव, रत्नागिरी, बुलढाणा, हातकणंगले, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ-वाशीम, दक्षिण मध्य मुंबई, उत्तर पश्चिम मुंबई, दक्षिण मुंबई, ईशान्य मुंबई, या जागा लढवणार असल्याचं निश्चित झालं आहे.

****

काँग्रेस पक्षाचे राज्य प्रवक्ते राजू वाघमारे यांनी काल काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वासह सगळ्या पदांचा राजीनामा देत, शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला. काँग्रेस पक्ष सध्या दबावात असून स्वत: कोणताही निर्णय घेण्याच्या परिस्थितीत नाही, असं मत वाघमारे यांनी व्यक्त केलं.

****

अमरावती लोकसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असलेले आनंद आंबेडकर यांना, ए आय एम आय एम पक्षानं पाठिंबा दिला आहे. पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी एका ट्विट संदेशातून ही माहिती दिली. अमरावती लोकसभा जागेवर भाजपनं नवनीत राणा यांना, तर काँग्रेसनं बळवंत वानखडे यांना उमेदवारी दिली आहे .

****

लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण, यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण यवतमाळ–वाशिम लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

छत्रपती संभाजीनगर इथले ज्येष्ठ पत्रकार प्रमोद माने यांचं काल हैदराबाद इथं निधन झालं, ते ६१ वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांच्यावर हैदराबाद इथं उपचार सुरू होते. मराठवाडा दैनिकातून पत्रकारितेला प्रारंभ केलेल्या माने यांनी, लोकसत्ता तसंच महाराष्ट्र टाईम्स दैनिकांसाठी आणि खासगी वृत्तवाहिन्यांसाठीही काम केलं. ३२ वर्षांच्या कारकिर्दीत अफाट जनसंपर्क आणि व्यासंगाच्या बळावर, राजकारण आणि समाजकारण या विषयांवरील पत्रकारितेसोबतच माने यांनी, क्रीडा पत्रकार म्हणून वेगळा ठसा उमटवला. जिल्हा क्रिकेट संघटनेचे सदस्य तसंच सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या शालेय समितीवरही ते कार्यरत होते. त्यांच्या पार्थिव देहावर छत्रपती संभाजीनगर इथं प्रतापनगर स्मशानभूमीत आज सकाळी आठ वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

धाराशिवच्या माजी नगराध्यक्ष पुष्पाताई चंद्रहास पाटोदेकर यांचं काल सकाळी धाराशिव इथं निधन झालं, त्या ८६ वर्षांच्या होत्या. धाराशिव जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांचं मोठं योगदान होतं. राज्याचे माजी गृहमंत्री आणि पाटबंधारे मंत्री डॉक्टर पद्मसिंह पाटील यांच्या त्या भगिनी होत.

****

अहमदनगर जिल्ह्यात बायोगॅसच्या विहिरीत पडून पाच जणांचा मृत्यू झाला. नेवासे तालुक्यात वाकडी इथं ही घटना घडली. या विहिरीत पडलेल्या मांजराला वाचवण्यासाठी काहीजण विहिरीत उतरले, मात्र त्यात साचलेल्या शेणाच्या दलदलीत अडकल्यानं, पाच जणांचा मृत्यू झाला, तर एकाला वाचवण्यात यश आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

मराठवाड्याच्या अनेक भागात काल अवकाळी पावसानं हजेरी लावली.

लातूर शहर आणि परिसरात सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास जोरदार वाऱ्यासह पाऊस झाला. १० ते १५ मिनिटं झालेल्या या पावसामुळे आंब्याचं नुकसान झाल्याची वृत्त आहे.
बीड जिल्ह्यात अंबाजोगाई शहर आणि परिसरात काल दुपारी मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटासह पाऊस झाला.
हिंगोली जिल्ह्यात काल संध्याकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास अनेक भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. सेनगाव तालुक्यात काही भागात गारपीटही झाल्याचंही आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.
परभणी जिल्ह्यातही विजेच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह सर्वदूर पाऊस झाल्याचं, तसंच नांदेड शहर परिसरातही हलका पाऊस झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.
विदर्भातही अकोला, अमरावती, वाशिम, बुलडाणा आदी भागात पाऊस तसंच गारपीट होऊन शेतपिकं आणि आंब्याचं नुकसान झाल्याचं वृत्त आहे.
मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं नांदेड जिल्ह्यासाठी येत्या बारा तारखेपर्यंत येलो अॅलर्ट जारी केला आहे. या काळात जिल्ह्यात एक किंवा दोन ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगानं वादळी वारे वाहण्याची, तसंच विजेच्या कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

****

हिंदू नववर्षदिन अर्थात गुढी पाडवा काल राज्यात उत्साहात साजरा करण्यात आला. घरोघरी गुढ्या उभारण्यात आल्याचं तसंच रांगोळ्यांची सजावट केल्याचं दिसून आलं. पैठण इथं शककर्ता सम्राट शालिवाहन राजाच्या प्रतिमेची काल मिरवणूक काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन ढोल ताशांच्या निनादात या मिरवणुकीला सुरुवात झाली. छत्रपती संभाजीनगररातून ग्रामदैवत संस्थान गणपतीपासून शोभायात्रा काढण्यात आली. नागरिक मोठ्या संख्येनं यात सहभागी झाले होते.
हिंदू नववर्ष आणि गुढीपाडव्यानिमित्त बीड शहरात काल सकाळी बालाजी मंदिरापासून नववर्ष स्वागत फेरी काढण्यात आली.
गुढीपाडवा सणाचं औचित्य साधून काल महाविकास आघाडीच्या वतीनं लातूर शहरात कॉंग्रेस भवनासमोर परिवर्तनाची गुढी उभारण्यात आली. कॉंग्रेस नेते, माजी

मंत्री आमदार अमित देशमुख यांच्यासह, महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते गुढी उभारण्यात आली.

****

परभणी लोकसभा मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढवण्याच्या दृष्टीनं, मतदानाची गुढी, हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये परभणी शहरातल्या शारदा सामाले यांनी मतदानाची गुढी उभारली. मतदानाचं आवाहन करणारी अनेक घोषवाक्यं, मतदान केंद्राची प्रतिकृती आणि मतदान केल्याची शाई लावलेला हात तसंच स्वीपची सुंदर रांगोळी काढून, गुढीभोवती आकर्षक सजावट करण्यात आली होती.

****

सामान्य निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र यांनी काल नांदेड दक्षिणच्या विष्णुपुरी मतदान केंद्राला भेट देऊन पाहणी केली. या मतदान केंद्रावरच्या सुविधा, मतदार यादी, मतदान यंत्रं आणि इतर साहित्याची त्यांनी तपासणी करून, एकूण तयारीबद्दल समाधान व्यक्त केलं.

****

नांदेड जिल्ह्यातली जी विधानसभा क्षेत्रं नांदेड, हिंगोली आणि लातूर लोकसभा मतदार संघात येतात, त्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी येणाऱ्या आठवडी बाजारांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. आता मतदानाच्या दुसऱ्या दिवशी याठिकाणी बाजार भरणार आहेत.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या महिला बचत गटांनी लोकसभा निवडणुकीच्या मतदान जनजागृतीसाठी पुढाकार घेतला आहे. यामध्ये एक हजार बचत गटातल्या सुमारे एक लाख महिलांनी जिल्ह्यात दारेफळ आणि खांडेगावसह विविध गावांमध्ये मतदान जनजागृतीसाठी फेऱ्या काढल्या, तसंच मतदानाची प्रतिज्ञा दिल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या येडशी रामलिंगघाट अभयारण्यात गेल्या दहा दिवसांत नऊ माकडं दगावल्याचं समोर आलं आहे. अन्नाच्या विषबाधेतून ही माकडं दगावल्याची शक्यता वनविभागानं वर्तवली आहे. या माकडांचा व्हिसेरा तपासणीसाठी

पाठवण्यात आला असून, विभागीय वनाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार माकडांचा वावर असलेल्या भागांमध्ये आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

****

येत्या सोळा ते पंचवीस एप्रिल या कालावधीत नांदेड इथं विविध खेळांसाठी उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. हे शिबीर सगळ्या वयोगटातल्या विद्यार्थी खेळाडूंसाठी नि:शुल्क असणार आहे.

****